|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- २४ जानेवारी, २०२४

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) एम. एड अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणा-या केंद्रीय प्रवेश परीक्षेकरीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातर्फे मार्गदर्शन वर्ग आयोजित केले जाणार असून सीईटी परीक्षेचे ऑनलाईन अर्ज देखील या विभागामार्फत मोफत भरून दिले जात आहेत.

माहितीपुस्तिका, अर्ज व प्रवेश प्रक्रियेसाठी विहीत शुल्क भरण्यासाठी दि. १० जानेवारीपासून https://mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध असून दि. २९ जानेवारी ही अर्ज भरण्याची अंतिम मूदत आहे. बी. एड उत्तीर्ण अथवा प्रविष्ठ तसेच डी. टी. एड उत्तीर्ण विद्यार्थी केंद्रीय प्रवेश परीक्षेसाठी पात्र आहेत. शिक्षणशास्त्र विभागामार्फत ऑनलाईन अर्ज मोफत भरून दिले जात आहेत. अधिक माहितीसाठी विभागप्रमुख डॉ. मनीषा इंदाणी अथवा डॉ. संतोष खिराडे यांच्याशी ०२५७-२२५८४३१/४३७ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

## बातमी क्रमांक २

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळेतील मराठी विभागातर्फे सुरू असलेल्या भाषा संवर्धन पंधरवड्या अंतर्गत कथाकार ॲड विलास मोरे यांच्या कथाकथनाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. म. सु. पगारे होते. विलास मोरे यांनी संध्याकाळची गोष्ट ही कथा सादर केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. नेत्रा उपाध्ये यांनी केले. प्रा. प्रतिभा गलवाडे यांनी आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी